CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 26.07.2021

**सिडकोकडून 219 हेक्टर कांदळवन क्षेत्र**
**वन विभागाला हस्तांतरीत करण्यात येणार**

सिडको महामंडळाकडून कांदळवनांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता, महामंडळाच्या ताब्यातील 219 हेक्टर कांदळवन क्षेत्र राज्य वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मा. जिल्हाधिकारी, रायगड यांच्या मार्फत सदर कांदळवन क्षेत्र वन विभागाला हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

"सिडकोने नेहमीच पर्यावरणपूरक विकासाचा आपल्या धोरणाद्वारे पुरस्कार केला आहे. या धोरणाला अनुसरूनच नवी मुंबईतील कांदळवनांच्या संरक्षण व संवर्धनाकरिता, सिडकोच्या ताब्यातील 219 हेक्टर कांदळवन क्षेत्र वन विभागाला हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे."

डॉ. संजय मुखर्जी
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

मुंबई महानगर प्रदेशातील कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी, संबंधित प्राधिकरणांकडून आपापल्या अखत्यारीतील कांदळवन क्षेत्रांचे वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे हस्तांतरण करण्यात येत आहे. यानुसार, सिडकोकडून नवी मुंबई प्रकल्प अधिसूचित क्षेत्रातील, पनवेल तालुक्यातील मौजे कामोठे आणि मौजे पनवेल येथील एकूण 219 हेक्टर कांदळवन क्षेत्रही वन विभागाला हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात सिडकोने जिल्हाधिकारी, रायगड यांच्याशी पत्र व्यवहार केला असून जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून 27 जुलै 2021 रोजी सिडकोच्या कांदळवन क्षेत्राचा ताबा घेण्यात येऊन, त्यानंतर हे क्षेत्र वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तसेच पुढील टप्प्यात पनवेल आणि उरण तालुक्यांतील काही कांदळवन क्षेत्रे, कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**